दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०९ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## दुर्गम भागासाठी 2000 मिडी बसेस सज्ज; मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई :** भविष्यात एसटी बसेसची कालमर्यादा १५ वर्षांवरून थेट ८ वर्षांवर आणण्याचे सरकारचे धोरण असून, कालबाह्य होणाऱ्या जुन्या बसेसच्या जागी मोठ्या प्रमाणावर अत्याधुनिक ई-बसेस (EV) ताफ्यात सामील केल्या जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मंत्री सरनाईक यांनी सभागृहात केली. विधानपरिषदेत आज प्रश्नोत्तराच्या तासात एसटी महामंडळाच्या बसेसची स्थिती, प्रवाशांची सुरक्षा आणि वाढत्या अपघातांवर आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अत्यंत सकारात्मक आणि सविस्तर उत्तरे दिली.


### पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### युद्धविराम संपुष्टात, इराणवर पुन्हा जोरदार हल्ला करू - ट्रम्प

**अंकारा :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी सांगितले की, अमेरिका इराणवर आणखी एका रात्री हल्ला करण्याची तयारी करत आहे. याआधी काही तासांपूर्वीच त्यांनी युद्धविराम संपुष्टात आल्याचे विधान केले होते. संघर्ष पुन्हा सुरू होण्याच्या शक्यतेबाबत विचारलेल्या प्रश्नावर ट्रम्प म्हणाले, "आम्ही काल रात्री त्यांच्यावर अतिशय जोरदार हल्ला केला होता. कदाचित आज रात्रीही आम्ही त्यांच्यावर तितक्याच तीव्रतेने हल्ला करू." ट्रम्प यांनी हे वक्तव्य तुर्कियेची राजधानी अंकारा येथे आयोजित नाटो शिखर परिषदेदरम्यान केले. त्यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई सुरू आहे.इराणबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले, "ते अत्यंत चुकीचे वर्तन करत आहेत." त्यांनी आरोप केला की, इराणने व्यापारी जहाजांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या साहाय्याने हल्ले केले आहेत.

### गुरुवारी शाळा बंद ठेवल्यास वेतन कपातीची कारवाई




**मुंबई :** ९ जुलै २०२६ रोजी प्रस्तावित शाळा बंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कोणतीही शाळा बंद राहणार नसल्याचे स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देण्याचे निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत. तसेच आंदोलनाच्या दिवशी शाळा बंद ठेवल्यास संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर एका दिवसाच्या वेतन कपातीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. विविध माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार राज्यातील खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी त्यांच्या विविध मागण्यांसाठी ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलनात सहभागी होणार असल्याचे वृत्त समोर आले होते. या पार्श्वभूमीवर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच बृहन्मुंबईतील शिक्षण निरीक्षक यांना आवश्यक सूचना जारी केल्या आहेत.

### नागपूरमध्ये ब्रिक्स परिवहन मंत्र्यांची तिसरी बैठक

**नागपूर :** भारताच्या ब्रिक्स २०२६ अध्यक्षतेअंतर्गत महाराष्ट्रातील नागपूर येथे ११ आणि १२ जुलै २०२६ रोजी ब्रिक्स परिवहन मंत्र्यांची तिसरी बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत ब्रिक्स सदस्य देशांचे परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार असून, शाश्वत परिवहन व्यवस्था, पायाभूत सुविधांचा विकास तसेच जागतिक संपर्क व्यवस्थेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाणार आहे. भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेची संकल्पना "लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि स्थिरतेसाठी निर्माण" या उद्दिष्टानुसार या बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. तांत्रिक प्रगती आणि सुधारित संपर्क व्यवस्थेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासाला चालना देणे हा या बैठकीचा प्रमुख उद्देश आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे ११ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. बैठकीला ब्रिक्स देशांचे संबंधित मंत्री आणि वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित राहतील.

### "शाल जोडे"




# आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांवर आक्षेपार्ह टीका

## सरपंच मंगेश साबळे यांचा जिल्हाधिकारी कार्यालया समोर धिंगाणा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे शिक्षकांच्या मृत्यूची आणि लहान मुलांच्या हक्काच्या शिक्षणाची ही भावनिक बाजू असली, तरी दुसरीकडे सरपंच मंगेश साबळे यांनी आंदोलनासाठी निवडलेला मार्ग अत्यंत चुकीचा आणि अशोभनीय आहे अशी तीव्र चर्चा आता स्थानिक नागरिकांमधून आणि प्रशासकीय वर्तुळातून ऐकायला येत आहे.देशातील सर्वोच्च परीक्षा उत्तीर्ण होऊन आलेल्या एका वरिष्ठ आयएएस (IAS) प्रशासकीय अधिकाऱ्याला 'ए कलेक्टर अंग्रेज की अवलाद चल नीचे आव' अशा भाषेत एकेरी नावाने जाहीरपणे संबोधणे आणि जिल्ह्याच्या सर्वोच्च कार्यालयासमोर अशा पद्धतीने धिंगाणा घालणे हे लोकशाहीच्या मार्गाने निवडून आलेल्या एका जबाबदार सरपंचाला कितपत शोभते, असा मोठा प्रश्नचिन्ह आता या घटनेमुळे उपस्थित झाला आहे. मुलांच्या हितासाठी आणि शिक्षकांच्या हक्कासाठी लढणे गरजेचे असले, तरी एका संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीशी संवाद साधताना भाषेची आणि वर्तनाची मर्यादा पाळली जावी, अशी अपेक्षा सुजाण नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.




### सिटी चौक पोलिसात गुन्हा दाखल

**जिल्हाधिकारी कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिटी चौक पोलिसांनी सरपंच मंगेश साबळे यांच्याविरोधात तात्काळ पावले उचलली आहेत. विविध कलमांखाली गुन्हा: शासकीय कामात अडथळा आणणे, सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करणे आणि बेकायदेशीर वर्तन करणे या संदर्भातील विविध कायदेशीर (कलम १३२, १२६, १८६, १८९, ३५१) कलमांतर्गत (आयपीसी/बीएनएस नुसार) हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू: सिटी चौक पोलीस स्टेशनचे अधिकारी या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, कार्यालयातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.**

फुलंब्री तालुक्यामध्ये जिल्हा परिषद शाळेमधील चार शिक्षकांना बीएलओ (BLO) च्या कामाला लावण्यात आल्यामुळे सध्या शिक्षण व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. शिक्षकांना अशैक्षणिक कामात अडकवल्यामुळे शाळेमधील शिक्षणाची गुणवत्ता खालावते आहे आणि विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकांची मोठी कमतरता निर्माण झाली आहे.

या निष्पाप मुलांना शाळेत नक्की कोण शिकवणार, हा अत्यंत भावनिक आणि गंभीर प्रश्न घेऊन फुलंब्री तालुक्यातील सरपंच मंगेश साबळे यांनी काल थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. निवडणूक विभागाच्या (एस आय आर) च्या कामासाठी सातत्याने शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत आहे. या अतिरिक्त कामाचा प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताण आल्यामुळे यापूर्वी काही शिक्षकांना हृदयविकाराचा झटका आला असून त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यूही झाला आहे. याच वेदनादायी पार्श्वभूमीवर, आपल्या गावातील मुलांचे भविष्य अंधारात जाऊ नये म्हणून सरपंच मंगेश साबळे यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना धारेवर धरले. 'कलेक्टर बधीर झालाय का?' अशा संतप्त आणि मोठमोठ्या घोषणा देत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये प्रचंड गोंधळ घातला.



### अजिंठा लेणीचा धबधबा मोठ्या प्रतिक्षेनंतर सुरु

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी चा धबधबा मोठ्या प्रतिक्षेनंतर आता चालू झाला असून पर्यटकांनी याचा आनंद घ्यावा जुलै महिन्याचा एक आठवडा झाल्यावर फर्दापूर परिसरात बुधवारी सकाळी चांगल्याप्रकारे पाऊस झाला असल्याने जगप्रसिद्ध अजिंठा लेणी चा धबधबा पर्यटकांसाठी ओसंडून वाहत आहे.

# "आधी संसार मोडला, आता जगणंही कठीण केलंय..." जाहीरपणे अपमानित झालेल्या परित्यक्ता तरुणीची हर्सूल पोलिसांत धाव!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** दुर्दैवाने नातेवाइकाने आत्महत्या केली, त्याचे खापर अंगावर फुटले. त्यानंतर सुखाचा संसार थाटायचा प्रयत्न केला, तर तिथेही मिठाचा खडा पडला. पतीसोबत न्यायालयात वाद सुरू असल्याने मागील दोन वर्षांपासून विभक्त राहून वडिलांच्या आडोशाला आलेल्या एका २५ वर्षीय तरुणीच्या वेदनेला समाजात अजूनही पूर्णविराम मिळालेला नाही. "माझ्या भावाच्या मृत्यूला तूच कारणीभूत आहेस," असा चुकीचा आरोप करत एका विकृत मानसिकतेच्या युवकाने भररस्त्यात या तरुणीचा जाहीर अपमान केला, तिच्या अंगावर थुंकला आणि तिच्या वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली. या छळाला कंटाळून अखेर या असहाय्य तरुणीने हर्सूल पोलीस ठाण्यात न्यायासाठी धाव घेतली आहे. पीडित तरुणीचे वडील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. १४ एप्रिल २०२३ रोजी तरुणीच्या ओळखीचा नातेवाइक गोविंद संजय हासे (रा. जाधववाडी) याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेशी तरुणीचा थेट संबंध नसतानाही, मृतक गोविंदचा मोठा भाऊ कैलास हासे हा तिच्यावर संशय घेऊ लागला. या घटनेनंतर २३ जून २०२३ रोजी तरुणीचे लग्न हर्सूल गावातील एका युवकासोबत झाले. मात्र, कैलासने तिच्या सासरच्या लोकांचे कान भरणे सुरूच ठेवले. "तिच्यामुळेच माझ्या भावाने जीव दिला," असे खोटेनाटे सांगून त्याने पती-पत्नीत सतत भांडणे लावून दिली. परिणामी, लग्नानंतर काही दिवसांतच या तरुणीचा संसार मोडला आणि गेल्या दोन वर्षांपासून ती पतीविरुद्ध कोर्टात कायदेशीर लढाई लढत आई-वडिलांकडे राहत आहे. २८ जून रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास तरुणी काही कामानिमित्त पासपोर्ट फोटो काढण्यासाठी टीव्ही सेंटर परिसराकडे जात होती. बारव रोडवरील खुशी लॉन्सजवळील चौकात कैलास हासे एका पानटपरीवर उभा होता. तिला पाहताच त्याच्यातील द्वेष उफाळून आला. तिथे उभ्या असलेल्या लोकांसमोर तो ओरडला, "हिच्यामुळेच माझा भाऊ मेला..." असे म्हणत त्याने तरुणीकडे पाहून रस्त्यावर थुंकले. भरचौकात तिला अश्लील शिवीगाळ करत, "तुझ्या वडिलांना जिवे मारेन आणि तुझा संसार कधीच होऊ देणार नाही," अशी उघड धमकी दिली. भररस्त्यात झालेल्या या प्रकारामुळे ती तरुणी पूर्णपणे हादरून गेली आहे. आधीच संसाराची राखरांगोळी झालेली असताना, आता वडिलांच्या जिवाला निर्माण झालेल्या धोक्यामुळे तिने पोलिसांकडे संरक्षणाची गुहार लावली आहे. हर्सूल पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पोलीस अंमलदार निर्मला कोलते पुढील तपास करत आहेत.

## तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का; ईडीने 440 कोटींच्या ठेवी गोठवल्या

**कोलकाता :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) धनशोधन प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) अंतर्गत कारवाई करत तृणमूल काँग्रेसच्या ४४०.४२ कोटी रुपयांच्या बँक ठेवी गोठवल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही रक्कम पक्षाच्या तीन खासगी बँक खात्यांमध्ये जमा होती. या प्रकरणावर तृणमूल काँग्रेसकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नव्हती. ईडीने मंगळवारी कोलकाता येथे पाच ठिकाणी छापेमारी केली. यामध्ये केअरवेल ग्रुप ऑफ कंपनीज तसेच त्यांची विमान चार्टर सेवा चालवणारी कंपनी केअरवेल एव्हिएशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडशी संबंधित ठिकाणांचाही समावेश होता. ईडीचा आरोप आहे की, प्राथमिक तपासात एप्रिल २०२३ ते जून २०२६ या कालावधीत तृणमूल काँग्रेसच्या खात्यांमधून सुमारे १६० कोटी रुपये केअरवेल एव्हिएशन आणि तिच्या संबंधित कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आले.तपासादरम्यान असेही समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे की, संबंधित कंपनीने २०२३ ते २०२६ या कालावधीत ८२.९६ कोटी रुपये एका नव्याने स्थापन झालेल्या कंपनीकडे वर्ग केले. ईडीच्या माहितीनुसार, याच निधीपैकी ११२ कोटी रुपयांचा वापर एम्ब्रेयर लेगेसी ६०० या बिझनेस जेटची तसेच ऑगस्टावेस्टलँड १०९एसपी हेलिकॉप्टरची खरेदी करण्यासाठी करण्यात आला.

## आयशरची दुचाकीला धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** पूर्णा नांदेड महामार्गावर बुधवार दिनांक आठ जुलै रोजी दुपारी बारा वाजता सुमारास भरधाव वेगाने वेगाने येणाऱ्या आयशर दुचाकी स्वराला उडवल्याने अपघात एवढा भयंकर होता की या अपघातात दुचाकी स्वराच्या जागीच मृत्यू झाला याप्रकरणी चुडावा पोलीस ठाण्यात गुन्ह्या नोंदविण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की शेख सत्तार शेख जुलपेकर वय 51 वर्ष रानात आनंदनगर परभणी हल्ली मुकाम क्रांतीनगर पूर्णा असे मयताचे नाव असून शेख सत्तार हे बुधवारी दुपारी एम एच २२ ए जे 05 16 या दुचाकीने पूर्णा येथून चुडाव्याच्या दिशेने जात होते गौर शिवारात नावेल्टी बिअर बार च्या समोर भरधाववेगातील एम एच 26 सीएच 91 97 या क्रमांकाच्या आयशरणे दुचाकीला जोराची धडक दिली. हा अपघातात गंभीर जखमी झाल्याने शेख सत्तार यांचा जागीच मृत्यू झाला अपघाताची



माहिती मिळताच सपोनी सुशांत पिंगे पोलीस अंमलदार महादेव आगळे विलास मिटके गौतम ससाने यांनी घटनास्थळी धाव घेतली पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेतली व मयताचा मृतदेह उत्तरे तपासणीसाठी पूर्ण ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला या घटनेची चुडावा पोलिसात नोंद करण्यात आली आहे.

## महावितरणच्या लोडशेडिंगचा बँक ऑफ महाराष्ट्रला मोठा फटका

### जनरेटर-इन्व्हर्टर अभावी टीव्ही सेंटर आणि बजरंग चौक शाखेचे कामकाज ठप्प!

हिंदू प्रकाशवार्ता / नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील महावितरण कंपनीने अचानक घेतलेल्या लोडशेडिंगचा मोठा फटका आज बँक ऑफ महाराष्ट्रच्या दोन प्रमुख शाखांना बसला. टीव्ही सेंटर आणि बजरंग चौक येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखांमध्ये आज सकाळपासून वीज पुरवठा खंडित (लाईट नसणे) झाल्यामुळे बँकेचे संपूर्ण कामकाज दिवसभर ठप्प झाले होते. यामुळे ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले.आज दिवसभर या दोन्ही शाखांमधील कोट्यवधी रुपयांचे व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले होते. दिवस संपत आला तरी बँक अधिकाऱ्यांकडून किंवा उच्च प्रशासनाकडून या समस्येची दखल घेण्यात आली नाही, की ग्राहकांसाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही. ही अत्यंत खेदजनक आणि विशेष बाब मानली जात आहे. महावितरणचे ढिसाळ नियोजन आणि बँक व्यवस्थापनाची उदासीनता या दुहेरी संकटामुळे आज सामान्य ग्राहक आणि वृद्धांना नाहक मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागले. यावर बँक प्रशासन भविष्यात काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वीज नसल्यामुळे बँकेच्या संगणकीय प्रणाली आणि सर्व्हर बंद पडले होते. परिणामी, बँकेत आलेल्या कोणत्याही ग्राहकाला ना पैसे काढता येत होते, ना खात्यात पैसे जमा करता येत होते. याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, पेन्शनधारक आणि वयस्कर ग्राहकांना बसला. ६० ते ७० वर्षे वयोगटातील हे वृद्ध ग्राहक तासनतास बँकेत ताटकळत उभे होते. मात्र, वीज नसल्याने त्यांना रिकाम्या हाताने आणि निराश होऊन घरी परतावे लागले, ज्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### बँकेचा ढिसाळ कारभार: फक्त एक तासाचा इन्व्हर्टर बॅकअप!




**या निमित्ताने बँक प्रशासनाचा अत्यंत ढिसाळ आणि बेजबाबदार कारभार समोर आला आहे. एवढ्या मोठ्या राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये तातडीच्या परिस्थितीसाठी फक्त १ तास चालेल एवढीच क्षमता असणारे इन्व्हर्टर बॅकअप उपलब्ध आहे. इन्व्हर्टर संपल्यानंतर बॅकअपसाठी बँकेकडे जनरेटरची कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध नव्हती. "डिजिटल इंडिया आणि हाय-टेक बँकिंगच्या गप्पा मारणाऱ्या बँक प्रशासनाकडे अशा आणीबाणीच्या वेळी वीज पुरवठा सुरू ठेवण्यासाठी साधे जनरेटर का उपलब्ध नाही?" असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिक विचारत आहेत.**

# मनपातच शहराच्या नावाबाबत गोंधळ; एका फलकावर 'औरंगाबाद', दुसऱ्यावर 'छत्रपती संभाजीनगर'

## शासनाच्या स्पष्ट आदेशानंतरही जुन्या नावाचा वापर कायम; प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाने शहर व जिल्ह्याचे अधिकृत नामांतर करून 'छत्रपती संभाजीनगर' हे नाव सर्व शासकीय कार्यालये, कागदपत्रे, फलक आणि पत्रव्यवहारात वापरण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतच शहराच्या नावाबाबत विसंगती दिसून येत आहे. एकाच इमारतीत दोन वेगवेगळ्या नावांच्या पाट्या लावण्यात आल्याचे समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.










महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर यांच्या दालनाबाहेरील फलकावर "मनपा छ. सं. न. (औरंगाबाद)" असा उल्लेख करण्यात आला आहे. म्हणजेच शहराचे जुने नाव 'औरंगाबाद' अद्यापही अधिकृत फलकावर कायम ठेवण्यात आले आहे. दुसरीकडे, सभागृह नेते गोविंद परशुराम केंद्रे यांच्या दालनावरील फलकावर "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका" असा उल्लेख करण्यात आला आहे.

एकाच महानगरपालिका इमारतीत दोन भिन्न नावांचे फलक असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, शासनाच्या आदेशांचे पालन नेमके कोण करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शहराचे अधिकृत नामांतर होऊन बराच कालावधी लोटला असतानाही काही कार्यालयांमध्ये अजूनही 'औरंगाबाद' हे नाव कायम ठेवले जात असल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर टीका होत आहे.

विशेष म्हणजे, शासकीय कार्यालयांनी सर्व फलक, शिक्के, पत्रव्यवहार आणि अधिकृत नोंदींमध्ये नव्या नावाचा वापर करणे अपेक्षित असताना, महानगरपालिकेसारख्या प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्थेतच अशी विसंगती दिसून येणे धक्कादायक मानले जात आहे. काही ठिकाणी जाणूनबुजून जुने नाव वापरले जात असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

या प्रकाराची तातडीने दखल घेऊन महानगरपालिका प्रशासनाने सर्व विभागांतील फलकांची पडताळणी करून शासनाच्या आदेशानुसार 'छत्रपती संभाजीनगर' या नावाचा एकसमान वापर सुनिश्चित करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी कागदोपत्रीच मर्यादित राहिल्याची भावना अधिक बळावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## मान्सूनचे आव्हान आणि कृषी क्षेत्रापुढील सज्जता

नैऋत्य मोसमी पावसाची अनिश्चितता आणि हवामानातील बदलांमुळे निर्माण होणारे एल निनोचे सावट या पार्श्वभूमीवर, देशातील कृषी क्षेत्राला संकटातून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने दाखवलेली प्रशासकीय तत्परता अत्यंत दिलासादायक आहे. चालू हंगामाच्या सुरुवातीला पावसाने दिलेली ओढ चिंतेची बाब ठरली होती. जून महिन्यात पावसाची मोठी तूट नोंदवली गेली असली, तरी जुलै महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे या परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. पावसाची तूट कमी होणे आणि देशातील पर्जन्यमानाची कमतरता असलेल्या जिल्ह्यांची संख्या घटणे, हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेती क्षेत्रासाठी सकारात्मक संकेत आहेत. मात्र, खरीप पेरण्यांवर झालेला परिणाम पाहता, अजूनही परिस्थिती पूर्णपणे पूर्वपदावर आलेली नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. केंद्रीय कृषी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर खरीप पेरणी पूर्ण झाली असली, तरी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ती अद्यापही बरीच मागे आहे. विशेषतः मान्सूनच्या उशिरा आगमनाचा थेट फटका सोयाबीन आणि कापसासारख्या नगदी पिकांच्या पेरणीला बसला आहे. अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना धीर देणे आणि त्यांना पारंपरिक पिकांऐवजी मका, बाजरी व मूग यांसारखी कमी कालावधीत आणि कमी पाण्यात येणारी पर्यायी पिके घेण्याचा सल्ला देणे, हे योग्य धोरण ठरले आहे. सरकारने केवळ संकटाची वाट न पाहता एप्रिल महिन्यापासूनच भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या सहकार्याने जिल्हावार आपत्कालीन योजना तयार केल्या, ही दूरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे. 'खेत बचाओ अभियान' सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचून त्यांना मार्गदर्शन केल्याने ग्रामीण भागात एक विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. खरीप हंगाम अखंडितपणे सुरू राहण्यासाठी सरकारने राष्ट्रीय बियाणे साठा सुरक्षित ठेवला आहे, तसेच किसान क्रेडिट कार्ड मोहिमेला गती देऊन शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रतिकूल हवामानामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा विस्तार करणे ही अत्यंत आवश्यक पाऊल आहे. एल निनोच्या संभाव्य धोक्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी उभारण्यात आलेली विशेष निरीक्षण यंत्रणा आणि राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष यामुळे येणाऱ्या काळात हवामानातील कोणत्याही आकस्मिक बदलांना तातडीने सामोरे जाणे शक्य होणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्रितपणे राबवलेले हे धोरण शेतकऱ्यांना केवळ संकटातून वाचवणार नाही, तर देशाच्या अन्नसुरक्षेलाही बळकटी देईल यात शंका नाही.

## मिराबाईच्या संघर्षाला सलाम : एका आंब्याच्या पाठीवर उभा केला संसार... मुलीचं दु:ख पचवत नातवाच्या भविष्यासाठी आजही उन्हात उभ्या

हिंदू प्रकाशवार्ता / सहयोग प्र.जावळे

कन्नड : दि.०८ जुलै - आयुष्याने प्रत्येक वळणावर कठीण परीक्षा घेतली... संसार मोडला, आई-वडिलांची जबाबदारी खांद्यावर आली, एकुलत्या एक मुलीचा अकाली मृत्यू झाला; पण या सगळ्या दुःखाने मिराबाई कोंडीराम राजपूत (वय ५८, रा. बनशेंद्रा) यांना कधीच खचवू शकले नाही. डोळ्यांत अश्रू आणि हातात आंब्यांची टोपली घेऊन त्यांनी केवळ कष्टाच्या बळावर संसार उभा केला. आजही त्या कन्नड बसस्थानक परिसरात आंबे विकताना दिसतात, पण त्यांच्या चेहऱ्यामागे दडलेला संघर्षाचा इतिहास अनेकांच्या डोळ्यांत पाणी आणणारा आहे.

सुमारे ३५ वर्षांपूर्वी त्यांचा विवाह सिल्लोड तालुक्यातील पळशी येथील शिवलाल राजपूत यांच्याशी झाला. मात्र, कौटुंबिक वादामुळे त्यांना माहेरी बनशेंद्रा येथे परतावे लागले. त्यानंतर त्यांनी वृद्ध आई-वडिलांची अखेरपर्यंत सेवा केली. स्वतःच्या वेदना बाजूला ठेवत त्यांनी एकुलत्या एक मुलीचे संगोपन केले, तिला शिक्षण दिले आणि मोठ्या आशेने तिचे लग्न लावून दिले. परंतु नियतीने पुन्हा एकदा मोठा घाव घातला. लग्नानंतर काही दिवसांतच घरगुती वादातून मुलगी संगीता हिचा मृत्यू झाला. त्या वेळी तिचा मुलगा तेजस अवघा एका वर्षाचा होता.

मुलीच्या जाण्याचे दुःख मनात दडवून मिराबाई यांनी नातू तेजसला कुशीत घेतले आणि पुन्हा नव्याने जगायला सुरुवात केली. आईची माया, वडिलांची जबाबदारी आणि आजीचे प्रेम देत त्यांनी त्याला लहानाचे मोठे केले. आज तेजस नाशिक येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. नातवाला मोठे होताना पाहणे, हेच आता त्यांच्या आयुष्याचे एकमेव स्वप्न आहे.

संसार चालवण्यासाठी त्यांनी कोणतेही काम कमीपणाचे मानले नाही. कधी घराघरांत जाऊन भाजीपाला विकला, कधी आडावरून पाणी शेंदून मजुरी केली, तर गेली ३० ते ३५ वर्षे कन्नड बसस्थानकाजवळ उन्हात-पावसात आंबे आणि




इतर फळांची विक्री करून त्यांनी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. प्रत्येक आंब्याच्या विक्रीतून त्यांनी नातवाच्या शिक्षणासाठी पै-पै साठवली.

स्वतः गरिबीत आयुष्य जगत असतानाही माणुसकीचा हात त्यांनी कधी सोडला नाही. गावातील विठ्ठल-रुक्मिणी व लक्ष्मी माता मंदिरांना स्वखर्चातून गेट बसवून देणे, हरिनाम सप्ताहात संपूर्ण गावाला महाप्रसाद देणे तसेच धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी आर्थिक मदत करणे, अशा अनेक सेवाभावी कामांत त्या नेहमी अग्रेसर राहिल्या आहेत.

आज वयाची ५८ वर्षे झाली असली, तरी त्यांच्या हातातील कष्ट थांबलेले नाहीत. "नातू तेजसचे शिक्षण पूर्ण होऊन त्याला चांगली नोकरी लागेपर्यंत आणि हातपाय साथ देतील तोपर्यंत मी काम करत राहणार," असा निर्धार त्या व्यक्त करतात.

एका आंब्याच्या पाठीवर उभा राहिलेला हा संसार म्हणजे केवळ उदरनिर्वाहाची कहाणी नाही; ती एका आईची, आजीची, कष्टकरी महिलेची आणि संकटांसमोर कधीही न झुकणाऱ्या स्त्रीशक्तीची प्रेरणादायी गाथा आहे. मिराबाई राजपूत यांचा संघर्ष समाजाला एकच संदेश देतो—परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द आणि कष्ट यांच्या जोरावर आयुष्य पुन्हा उभे करता येते.

## श्री संत एकनाथ महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**पैठण दि ०८ :-** आषाढी एकादशी निमित्त पंढरपुरात भरणाऱ्या वैष्णव मिळत सहभागी होण्यासाठी मनाच्या शांतिब्रह्म श्री संत एकनाथ महाराज पालखीचे प्रस्थान मंगळवारी सायंकाळी जिल्हाधिकारी विनय गौडा, ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, पैठणचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारो भक्तांच्या साक्षीने गागा भट्ट चौकातील पालखी ओटा येथून करण्यात करण्यात आले.



आषाढी एकादशीसाठी राज्यभरातून मानाच्या दिंड्या पंढरपूरकडे रवाना होत असतांना पैठणची मानाची दिंडी असलेली नाथवंशज रघुनाथ महाराज पालखीवाले यांची श्री संत एकनाथ महाराज पायी पालखी दिंडीचे प्रस्थान ७ जुलै मंगळवार रोजी सायंकाळी ६.४५ वाजता झाले. या पायी पालखी रथ दिंडीत हजारो वारकरी भक्तांनी सहभाग घेतला. ही पायी पालखी दिंडी १८ दिवसांचा प्रवास करत आषाढीच्या पूर्व संध्येला पंढरपूरपुराला पोहोचणार आहे. दिंडीचा पहिला मुक्काम हा चनकवाडी येथे होता.तत्पूर्वी गागाभट्ट चौकात ही पालखी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. यावेळी हजारो पैठणकरांनी पालखीचे दर्शन घेत पालखी प्रस्थानाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव,आमदार विलास बाप्पू भुमरे, अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूने, एस.डी.एम नीलम बाफना तहसीलदार ज्योती पवार, नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर, मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे, भाजपा महिला प्रदेश सदस्या रेखाताई कुलकर्णी,भूषण कावसणकर उपनगराध्यक्ष तुषार पाटील, सा. बां. विभागाचे कार्यकारी उप अभियंता राजेंद्र बोरकर,नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, राज्य दूध संघाचे नंदलाल काळे, पंचायत समिती बिडीओ मनोरामा गायकवाड, सभापती वैशाली बोंबले,पंचायत समिती अधिकारी राजेश कांबळे,नगरसेविका संगीता वरकड, मंगल हिंगे,पूजा पारिक, नगरसेवक जितू परदेशी,ज्ञानेश्वर दहिवाळ,बजरंग लिंबोरे,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, व्यापारी महासंघाचे पवन लोहिया, अध्यक्ष जितेंद्र पांडे, शेखर शिंदे, शिवराज परिक, सुनील हिंगे,भाऊ वरकड, अक्षय पाटील, खुशालराव भवरे,अरुण काळे,रोहिदास जाधव,संदीप मडके, अजय भालेराव, दीपक पाहिलवान,ऋषी दहिबाते, ऋषी अय्यर,बाबा घटे, गजू ईच्छय्या,दिनेश परिख तसेच संत महंतासह हजारोंच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## अजिंठा घाटात घोडी पटांगणात लहसून घेवून जाणारा ट्रक पलटी



**अजिंठा :** छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात एक ट्रक पलटी झाली मंगळवारी सकाळी सहा वाजता ट्रक क्रमांक आर जे 20 जी सी 4381 हा राजस्थान हुन केरळ येथे लसुण घेऊन जात असताना घोडी पटांगणात हा ट्रक पलटी होऊन पडला यात चालक किल्नर किरकोळ जखमी झाले असून चालक यांनी सांगितले की मी घाट चढत असताना समोरून वळणावर एक ट्रक भरधाव वेगात माझ्या गाडीवर आला मी स्वतः जीव धोक्यात घालून गाडी खाली घातली यामध्ये आमचा जीव वाचला परंतु गाडी पलटी झाली असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यावेळी फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी विशाल घन , हिरालाल ठाकरे, हे स्वतः घाटात दिवस भर थांबून घाटात कुठल्याही प्रकारची ट्राफिक होऊ दिली नाही संध्याकाळी या गाडीतील माल दुसऱ्या गाडीत टाकण्याचे काम सुरू होते तसेच संध्याकाळी ट्राफिक वाढण्याची शक्यता होती परंतु या ठिकाणी पोलीस कर्मचारी संतोष उबाळे, फिरोज तडवी मदतनीस स्वप्निल चव्हाण यांनी घाटात संध्याकाळी एकतर्फी वाहतूक सुरळीत करण्यात आली होती

## पाणीपुरवठा व भूमिगत गटार योजनेच्या नवीन प्रस्तावास मंजुरी

### समितीच्या सर्व सदस्यांची उपस्थिती, परभणी मनपा स्थायी समितीची बैठक






छाया : उत्तम चोरसुरीकार

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** या अगोदर महानगरपालिकात मंजूर असलेले समांतर पाणीपुरवठा योजना व भूमिगत गटार काम त्वरित रद्द करून नवीन नवीन वस्ती व प्रभागाचा समावेश करत नवीन सुधारित प्रस्ताव तयार करण्याच्या ठरावाला मंजुरी देण्यात आली आहे. बुधवार दिनांक आठ जुलै रोजी पार पडलेल्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी स्थायी समितीचे बैठक झाली यावेळी महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर सचिव विकासरत्न पारखे यांच्यासह स्थायी समितीमधील सदस्य भगवान वाघमारे,सुनील देशमुख, नदीम इनामदार, आकाश लहाने, डॉ केदार खटिंग,अक्षय देशमुख, वेंकट डहाळे, अर्जुन सामाले, शेख रईस शेख हबीब, सागर गंगाळे, नौसीन अलीम कुरेशी, प्राप्ती विकास राजापुरे,सुलोचना मदनराव भालेराव,सपना वेंकटराव जुकटे,यांची उपस्थिती होती.

स्थायी समितीच्या बैठकीला सुरुवात झाल्यानंतर परभणी शहरातील विविध विकास कामात संदर्भात चर्चा करण्यात आली. प्रत्येक सदस्याने शहरातील समस्या सोडविण्याबाबत सूचना दिल्या व शहरात होणाऱ्या भूमिगत गटार पाणीपुरवठा योजनेचे जुने काम रद्द करण्यात यावे असा ठराव पारित करून सर्व सदस्यांनी मंजुरी दिली.

सदर कामाला चार वर्षांपूर्वी घेतलेल्या आराखड्यानुसार व जुन्या दरानुसार मंजुरी देण्यात आल्यामुळे हे काम अर्धवट होणार असल्याचे सदस्यांनी बैठकीत मांडले शहराची वाढलेली व्याप्ती लक्षात घेऊन तसेच आजचे कामाचे दर पाहिले असता नवीन प्रस्ताव तयार करण्याच्या मागणीला एक मताने मंजुरी देण्यात आली शहरातील वाढलेल्या व नवीन वस्त्या व प्रभागाचा या दोन्ही योजनेमध्ये समावेश होणार आहे. सध्याला पावसाळा सुरू असून स्वच्छतेच्या कामाला मंजुरी देण्यात आली व जिथे जिथे खड्डे पडले आहेत त्या खड्ड्यामध्ये मुरूम टाकण्या ऐवजी कच टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## भेसळयुक्त 138 किलो गूळ नागद येथे एफडीएने केला नष्ट

**कन्नड :-** दि. ०८ जुलै - ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या प्रकारांवर अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा कठोर कारवाई केली आहे. कन्नड तालुक्यातील नागद येथील एका गोदामावर धाड टाकून संशयित भेसळयुक्त व अस्वच्छ वातावरणात साठवून ठेवलेला १३८ किलो गूळ जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. ही कारवाई सोमवार (दि. ७ जुलै) रोजी करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, नागद येथील बनोटी रोडवरील नवकार कॉम्प्लेक्समधील 'निखिल किराणा अँड जनरल स्टोअर्स' च्या गोदामाची अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तपासणी केली. तपासणीदरम्यान गोदामात अत्यंत अस्वच्छ वातावरणात गूळ साठवून ठेवण्यात आल्याचे अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी यांच्या निदर्शनास आले. संबंधित गुळाचा दर्जा संशयास्पद वाटल्याने आणि भेसळीची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने कारवाई करत संपूर्ण साठा जप्त केला. ग्राहकांच्या आरोग्याला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी जप्त करण्यात आलेला १३८ किलो गूळ जागीच नष्ट करण्यात आला. बाजारात विक्री होणाऱ्या अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता तपासण्यासाठी अशा धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले.

नागरिकांनी अन्नपदार्थ खरेदी करताना त्याची गुणवत्ता, पॅकिंग, उत्पादन व मुदत संपण्याची तारीख तसेच विक्रेत्याकडील स्वच्छतेची खात्री करूनच खरेदी करावी. संशयास्पद किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास तातडीने अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार नोंदवून ग्राहक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त एस. आर. कारकाळे व सहाय्यक आयुक्त डी. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी आणि नमुना सहाय्यक अमोल कांबळे यांच्या पथकाने केली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची बैठक

### शरद पवार आणि नारायण राणे यांची विशेष उपस्थिती

**मुंबई :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी महाराष्ट्र शासन सीमाभागातील मराठी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरूच राहतील. सीमाभागातील मराठी बांधवांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बुधवारी विधानभवनात पार पडलेल्या सीमाप्रश्न उच्चाधिकार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, राज्याच्या राजकारणातील दोन ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री खासदार शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री खासदार नारायण राणे यांनी समितीचे सदस्य म्हणून या बैठकीला विशेष उपस्थिती लावली. विधानभवन येथे महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक झाली बैठकीस या बैठकीला उच्चअधिकार समितीचे सदस्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार जयंत पाटील, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, सचिन कल्याण शेट्टी, रोहित आर. पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, शशिकांत शिंदे, आमदार शिवाजी पाटील, गोपिचंद पडळकर, सदाभाऊ खोत उपस्थित होते.

## देवगिरीतील 28 विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासन भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा येथे भूवैज्ञानिक म्हणून निवड

**छत्रपती संभाजीनगर :** जुलै 2026 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगात मार्फत घेण्यात आलेल्या भूवैज्ञानिक परीक्षेच्या विविध पदांवर देवगिरी महाविद्यालयातील भूगर्भशास्त्राचे विद्यार्थी डॉ. रवी पवार, आणि डॉ. सोहम डवले यांची वरिष्ठ भूवैज्ञानिक म्हणून निवड झाली आहे. तसेच सहाय्यक भूवैज्ञानिक अधिकारी म्हणून क्षितिज सोनटक्के, संदीप नव्हेरकर, वेदिका मोरे, योगेश थोरात, श्रीहरी तारफे, यांची निवड झाली आहे. कनिष्ठ भूवैज्ञानिक पदी डॉ. संदीप सिरसाट, डॉ. विश्रांती कदम, गोविंद जोशी, विश्वजीत पाऊलबुध्ये, शुभम पवळ, कल्याणी जायभार, शुभम मोरे, शुभम तिप्पट, गौरव कुकडे, तुकाराम कोरडे, शहाजी काष्टे, भारती खंदारे, शेखर मोरे आणि विशाल घाडगे यांची निवड झाली आहे. तर प्रतीक्षा यादी मधून सुरेन कांबळे, नीरज पगार, विकास दासरवार, डॉ. विकास घडामोडे, कौस्तुभ गोसावी, महेश मोपकर आणि निकिता बेरे यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक वैज्ञानिक पदी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा. आमदार सतीश चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. रवी पाटील उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते भुगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. रंजना गावंडे भूगर्भशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. योगेश वागदे, इर्शाद कुरेशी, गणेश नलावडे, गौरी नरसापुर आणि संस्कृती बोबडे यांनी अभिनंदन केले आहे.

## रेल्वेचे प्रश्न रुळावर येतील.?; मराठवाड्याचे विकासात रेल्वेचा सिंहाचा वाटा

### कोणत्याही प्रदेशाच्या विकासात दळन वळणाचा वाटा मोठा असतो

हिंदूप्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:**ज्या भागात दळणवळणाची साधने अधिक त्या भागात प्रगतीच्या पाऊलखुणा दिसू लागतात. या साधनांचे जाळे जेवढे व्यापक आणि गतिमान तेवढी विकासाची गती अधिक दिसू लागते. मराठवाड्यात अधिकारी प्रमुख रस्ते चांगले झाल्याने दळणवळण वाढले त्याचबरोबर रेल्वेचा विकासही झाला. गेल्या काही वर्षात रेल्वेचे जाळे. वेगवेगळ्या प्रदेशांची राज्यांशी जोडणाऱ्या नव्या गाड्या सुरू झाल्या. तरीही अनेक रेल्वेचे प्रश्न हे वर्षानुवर्ष तसेच आहेत. रेल्वेच्या वतीने काही नवीन गाड्या जेव्हा सुरू होतात तेव्हा त्यांच्या वेळा. सातत्य यांचा विचार होत नाही. उदाहरणार्थ नांदेडहून पुण्याला जाणाऱ्या सर्वच गाड्या जो वेळ घेतात तो वेळ कोणत्याही प्रवाशांसाठी सोयीचा नसतो. परिणामी अशा गाड्यांऐवजी लोक खाजगी ट्रॅव्हल्स कडे वळतात. रेल्वेला काळानुसार धावावे लागणार आहे. नांदेड पुणे एक्सप्रेस गाडी हडपसर पर्यंत जाते. यातही प्रवाशांची गैरसोय आहे. गाडी पूर्ववत मुख्य स्थानकापर्यंतच गेली पाहिजे. त्याचबरोबर नांदेड हुन पुण्याला जाण्यासाठी लातूर दौंड मार्गे वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाली पाहिजे. सध्याच्या नांदेड. मुंबई वंदे भारतला प्रतिसाद कमी आहे पण होण्यासाठी जर वंदे भारत सुरू झाली तर प्रवाशांना खाजगी बस सारख्या धोक्याचा आणि झोप मी चा प्रवास करण्याची गरजच पडणार नाही. एवढेच नाही तर मुंबई हैदराबाद ही वंदे भारत गाडी व्हाया नांदेड अशी सुरू व्हायला पाहिजे...

या गाड्यांना प्रवाशांची प्रचंड गर्दी असते खूप आधी सुद्धा आरक्षण मिळत नाही. आशा देवगिरी वगैरे सारख्या गाड्यांचे डबे वाढवले पाहिजेत. रेल्वेतल्या स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर रेल्वे प्लॅटफॉर्मची स्वच्छता ही तेवढीच महत्त्वाची आहे. आजही बहुतेक रेल्वे स्थानकावर स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही. नाममात्र शुल्क आकारून का होईना पण स्वच्छ पिण्याचे पाणी प्रत्येक स्थानकावर उपलब्ध झाले पाहिजे. अनेक गाड्या भरपूर वेळ घेतात खरे तर वेळेच्या बाबतीत फारशी येथील ता ठेवता कामा नये तरच या साधनांचा उपयोग होतो. कमी वेळेत अधिकाधिक अंतर पार करण्याकडे आता प्रवाशांचा कल आहे.

दरवर्षी दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या वतीने खासदाराची एक बैठक घेतली जाते या बैठकीत काही खासदार ठळक मुद्दे मांडतात. काही प्रश्न वर्षानुवर्ष तसेच आहेत. याचा अर्थ खासदारांनी हे मुद्दे वारंवार मांडूनही रेल्वे प्रशासनाने त्याची दखल घेतलेली नाही. केवळ बैठका घेऊन उपयोग नाही तर अशा बैठकामध्ये काही निर्णय झाले पाहिजेत. अलीकडेच नांदेडला या विभागातील खासदारांची जी बैठक पार पडली त्या बैठकीत रेल्वेच्या कारभारावर खासदारांनी संताप व्यक्त केला. जर निर्णय होत नसतील तर बैठका घेता तरी कशाला अशी खासदारांची नाराजी होती. नव्या गाड्या सुरू करणे. आहेत त्या गाड्यांचा प्रवासाचा वेळ कमी करणे. शक्य त्या ठिकाणी दुहेरीकरणाला चालना देणे. प्लॅटफॉर्म व गाड्या स्वच्छ ठेवणे. या भागातल्या शेतकऱ्यांचा शेतमाल बाहेर पाठवण्यासाठी सर्व त्या सुविधा उपलब्ध करून देणे असे अनेक मुद्दे रेल्वेच्या बाबतीत आहेत. या सर्वच बाबतीत रेल्वे प्रशासनाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. रेल्वेची यंत्रणा जेवढी गतिमान होईल तेवढा या भागाचा कायापालटव विकास होईल.



सोयगाव - जळगाव ते पंढरपूर पायी दिंडी सोयगावला मुक्काम श्रीराम मंदिर येथे वारकऱ्यांची सेवा समाज प्रबोधनकार विष्णू मापारी यांनी केली वारकऱ्यांची सेवा मालिश व मसाज करून व बिस्कीट पुढे वाटप आणि आरोग्य धूत दिगंबर वाघ यांनी वारकऱ्याची सेवा बीपी चेक करून तसेच ओवारेस पावडर,पेन किलर मलम देऊन त्यांना आराम दिला वारकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.

# जिल्हा रुग्णालयात गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी; महिलेच्या पोटातील काढली दुर्मिळ गाठ

## 22 ते 24 आठवड्यांच्या गर्भाशयाएवढ्या आकाराची फायब्रॉईड गाठ; डॉक्टरांच्या प्रयत्नांना मोठे यश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागाने अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडत ४० वर्षीय महिलेच्या पोटातील १२×१५×१५ सेंमी आकाराची दुर्मिळ फायब्रॉईड गाठ काढण्यात यश मिळविले. उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या रुग्णावर ही शस्त्रक्रिया आव्हानात्मक मानली जात होती. मात्र अनुभवी डॉक्टरांच्या पथकाने कौशल्यपूर्ण उपचार करत रुग्णाला नवजीवन दिले.

बुलढाणा जिल्ह्यातील या महिलेला तीव्र पोटदुखी, पोट फुगणे आणि अतिरक्तस्रावाचा त्रास होत होता. जिल्हा रुग्णालयात तपासणी केल्यानंतर तिला एयूबी-एल (AUB-L) असल्याचे निदान



झाले. गर्भाशयात दोन मोठ्या फायब्रॉईड गाठी असल्याने गर्भाशयाचा आकार २२ ते २४ आठवड्यांच्या गर्भधारणेइतका वाढला होता. त्यामुळे तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्मिता चव्हाण यांच्या नेतृत्वात डॉ. मणियार व डॉ. अमारा यांनी ही यशस्वी शस्त्रक्रिया केली. भूलतज्ज्ञ डॉ. चव्हाण, डॉ. वासुकर आणि डॉ. प्रवीण यांनी कुशलतेने भूल देऊन शस्त्रक्रिया सुरक्षितरीत्या पार पाडली. ऑपरेशन थिएटरमध्ये सिस्टर आरती मुंडे यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

यशस्वी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती समाधानकारक असून तिच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. जिल्हा रुग्णालयात अशा प्रकारची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने आरोग्य विभागाच्या वैद्यकीय सेवांवर पुन्हा एकदा विश्वासाची मोहर उमटली आहे. उपचाराबद्दल रुग्ण व तिच्या नातेवाईकांनी डॉक्टरांसह संपूर्ण आरोग्य कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# आरपी. हॉस्पिटलचा वैद्यकीय क्षेत्रात नवा इतिहास 2 हजार कॅथलॅब प्रक्रिया करून केला परभणी सह अनेक जिल्ह्यातील रुग्णावर उपचार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**येथील आरपी हॉस्पिटल ने वैद्यकीय क्षेत्रात एक नवा इतिहासिक टप्पा पार केला आहे. हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागाने मंगळवारी दि.7जुलै 2. हजार कॅथ लॅब प्रक्रिया पूर्ण करण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला विशेष म्हणजे या सर्व शस्त्रक्रिया व प्रक्रिया शासकीय योजनांच्या अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आल्या असून यामुळे रुग्णावरील मोठा आर्थिक भार टळला आहे.

परभणीसह. हिंगोली. धाराशिव. बीड. लातूर. छत्रपती संभाजी नगर. वाशिम. नांदेड आणि बुलढाणा या.8. हून अधिक जिल्ह्यातील गंभीर रुग्ण उपचारासाठी आरपी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. येथे त्यांच्यावर वेळेत आणि यशस्वी उपचार करून त्यांना जीवदान देण्यात आले आहे. कोरोनरी अँजिओग्राफी.1. हजार 537 रुग्णांची तपासणी यशस्वीरित्या करण्यात आली परक्यूटेनियस ट्रान्सल्युमिनल कोरोनरी अँजिओप्लास्टी. 377 रुग्णांवर अत्यंत अवघड अशी अँजिओप्लास्टी करण्यात आली पर्मकॅथ.35. रुग्णांना किडनी उपचारादरम्यान याचा लाभ मिळाला.एट्रीयल सेप्टल डिफेक्ट.4. रुग्णांवर यशस्वी प्रक्रिया व्हे ट्रिक्युलर सेप्टल डिफेक्ट.2. रुग्णांचे प्राण वाचण्यात आले पेटंट.डक्टस आटीरिओसस.4. रुग्णांवर यशस्वी उपचार. परमनंट पेसमेकर इम्प्लांटेशन.4. रुग्णांच्या हृदयाचे ठोके नियमित करण्यासाठी पेसमेकर बसवण्यात आले. पेरीकार्डि ओसेंटेसिस टॅपिंग (हृदयाभोवती साचलेले पाणी काढणे).3. रुग्णांवर ही तातडीची प्रक्रिया करण्यात आली. रोटाब्लेशन परक्यूटेनियस ट्रान्सल्युमिनल कोरोनरी अँजिओप्लास्टी.2 अत्यंत गुंतागुंतीच्या केसेस यामध्ये यशस्वी करण्यात आल्या. कार्डियाक रिसि क्रोणायझेशन थेरपी विथ डिफिब्रिलेटर एका रुग्णावर ही अत्याधुनिक प्रक्रिया पार पडली. तसेच ब्लड प्रेशर व्हेरिएबिलिटी.( रक्तदाबातील चढ-उतार). एका रुग्णावर या द्वारे विशेष देखरेख व उपचार करण्यात आले. गरजू रुग्णांवर वेळेत योग्य उपचार करून आवश्यक असणाऱ्या सर्व शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले. जन आरोग्य योजना. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच लेबर कार्ड च्या माध्यमातून पूर्णपणे मोफत करण्यात आल्या आहेत.

हृदयविकाराच्या भटक्यासारख्या आप्पातकालीन स्थितीत गोल्डन अवर मध्ये उपचार मिळणे गरजेचे असते. आमच्या कार्डिओलॉजी विभागाने 24 तास तत्पर राहुन अनेक अतिधोकादायक शस्त्रक्रिया यशस्वी केल्या आहेत. असे आरपी हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी पत्रकारांना सांगितले. या संपूर्ण मोहिमेत वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमीर तडवी. कार्डिओलॉजी विभाग डॉ. दीपक कुबडे. तसेच मेडिसिन विभागाचे डॉ. सलाम तांबोळी. डॉ. शहाजी बोडखे. डॉ. संतोष हरकळ. डॉ. दैठणकर. डॉ. मुक्काम आदी सहभागी झाले.

# जैन टॅग ग्रुपच्या जादू प्रयोगाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खुलले आनंदाचे हास्य



हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासह त्यांच्या दैनंदिन शालेय जीवनात विरंगुळ्याचे क्षण देण्याच्या उद्देशाने जैन टॅग ग्रुपच्या वतीने नवजीवन स्कूल आणि पी. यू. जैन स्कूल येथे मोफत जादू प्रयोगाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक उत्तरदायित्व जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा प्रशासनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जादूगाराने सादर केलेल्या विविध आकर्षक व मनोरंजक प्रयोगांनी विद्यार्थ्यांना अक्षरशः खिळवून ठेवले. प्रत्येक प्रयोगानंतर विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आनंद व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि उत्साहामुळे शाळेचे वातावरण आनंदमय झाले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन टॅग ग्रुपच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली प्रोजेक्ट कमिटीच्या रचना पहाडे, कीर्ती पाटनी, मिताली काला, सारिका बडजाते, दिपाली पाडे, सपना पाटनी तसेच कोअर कमिटीच्या अनुपमा दगडा, दिपिका बडजाते आणि ग्रुपच्या सर्व २५ सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी जैन टॅग ग्रुपच्या वतीने नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूलचे संस्थापक, विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात 'एक विद्यार्थी, एक झाड' पर्यावरणपूरक उपक्रम संपन्न



**सिल्लोड :** वृक्षलागवड ही काळाची गरज बनली असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने झाड लावणे व त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. या उद्देशाने वृक्षवल्ली टीम सिल्लोड यांनी १०,००० वृक्ष लागवडीचा संकल्प अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय सिल्लोड येथे 'एक विद्यार्थी, एक झाड' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवला.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजनाने झाली. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक निशांत म्हस्के होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वृक्षवल्ली टीम तर्फे डॉ. शेखर दौड, योगेश दिवटे यांची उपस्थिती होती. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना झाडे लावण्यास प्रवृत्त करणे, झाडांचे संगोपन करणे आणि विद्यार्थ्यामध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे हा होता. या उपक्रमात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना आंबा, चिंच, जांभूळ, लिंब, पेरू, चिकू, डाळिंब, आवळा, गुलमोहर, चाफा, बकुळ, कांचन, पारिजातक अशा विविध रोपांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोपटे देऊन ते विद्यालयाच्या आवारात, शेतात, गावात किंवा स्वतःच्या घरी लावण्याचे व त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले.

डॉ. शेखर दौड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, झाडे ही आपली जीवनदायिनी आहेत आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी त्यांचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. योगेश दिवटे म्हणाले की, १०,००० वृक्ष लागवडीचा संकल्प अंतर्गत आतापर्यंत अनेक शाळेमध्ये वृक्षवल्ली टीम हा उपक्रम राबविला आहे व पर्यावरणाचे संरक्षण करत आहे.

याप्रसंगी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गजानन डमाळे यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व आणि पर्यावरणाचा राखला जाणारा समतो याविषयी आपल्या भाषणात सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी, या उपक्रमातून मुलांमध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाचे संकट व वृक्षारोपणाचे महत्त्व, त्याचबरोबर झाडे जगवण्याची शपथ मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांनी मुलांना आपल्या भाषणात दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश काळे यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक रमेश सोनवणे, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, भिकन आगारे, सुनील तांबे, कडूबा गीते, रमेश परदेशी, अंगद काळे, गणेश चव्हाण, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, डॉ.अमोल ताटू, गजानन दौड, संगीता तायडे, संगीता काळे, नम्रता वडमारे, हर्षदा सानान्से यांनी परिश्रम घेतले.

# खोकडपुरा स जी मंडई परिसरात SIR फॉर्म वाटपाला वेग; नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** खोकडपुरा सब्जी मंडई, उंट मोहल्ला परिसरात विशेष नोंदणी (SIR) प्रक्रियेला गती देण्यासाठी चारही BLO यांना एकत्रित बोलावून नागरिकांना SIR फॉर्मचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म वेळेत भरून जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात BLO तोटे सर, हरीश ससूरकर, करपे साहेब आणि समीना बाजी यांनी नागरिकांना फॉर्म वाटप, मार्गदर्शन तसेच नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देत मोलाचे सहकार्य केले. अनेक नागरिकांच्या शंकांचे निरसन करून प्रक्रिया सुलभ करण्यात आली. या मोहिमेला स्थानिक सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांचेही सक्रिय सहकार्य लाभले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेख



जमील, फिरोज खान (ज्युबिली पान), MIMचे हफीज अली, फय्याज खान, समीर भगवान, सुलतान बागवान, चाँद मामू, हबीब बागवान, बाबा शेख लाल आणि राजू इंगळे यांनी नागरिकांपर्यंत SIR फॉर्म पोहोचविणे, आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे आणि नोंदणी प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी MIMचे हफीज अली आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेख जमील यांनी परिसरातील नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "SIR प्रक्रिया ही प्रत्येक पात्र नागरिकाच्या लोकशाही हक्काशी निगडित आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक कागदपत्रांसह SIR फॉर्म वेळेत भरून संबंधित BLO यांच्याकडे जमा करावेत. आपल्या कुटुंबातील तसेच शेजारील पात्र नागरिकांनाही या प्रक्रियेत सहभागी करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे."

ज्या नागरिकांना SIR फॉर्म आवश्यक आहेत, त्यांनी आज व उद्या फय्याज खान (ज्युबिली पान) यांच्या निवासस्थानी भेट देऊन तेथे उपस्थित असलेल्या BLO अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले.

# फर्दापूर येथे वनविभागाची कारवाई दोन मोटरसायकल एक इसम ताब्यात



**फर्दापूर :** फर्दापूर गावात वनविभागाची कारवाई एक इसम दोन मोटरसायकल वनविभागाच्या ताब्यात बुधवारी एक वाजता फर्दापूर गावात येऊन संशयित आरोपी गौस खाँ कासम खाँ पठाण वय 45 वनकक्ष क्रमांक 495 वनक्षेत्रातील बांबू अवैध तोड करून अवैध वाहतूक केल्या प्रकरणी ताब्यात घेतले असून यामध्ये वापरलेली मोटरसायकल क्रमांक एम एच 20 डि वाय 8659 ,एम एच 19 बी के 1063 या दोन्ही गाड्या ताब्यात घेऊन जप्त करण्यात आल्या आहेत या कारवाईत उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहा वनसंरक्षक स्वप्निल भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके वनपरिमडळ अधिकारी जे आर तरटे एस एस सपकाळ,टि झेड सय्यद, वनसंरक्षक के के टोके, सविता सोनुने, ज्योती उजळे भारती बेराड, अश्विन राजमाने, अशोक दांडगे, सिध्दार्थ वैद्य, योगेश साळवे,प्रविण गवळी,विजय देवकर,जीवन दांडगे, दिनेश वाघ, वनमजूर राजू झोंड, भास्कर शहाणे,जावेद शेख, समदानी,कुणाल साबळे चालक सचिन झोंड यांनी ही कारवाई करण्यात आली.

# छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते ऋषिकेश सातभाई व पत्नी स्नेहा सातभाई यांना प्रशंसापत्र व सन्मान

**बिडकीन दि ८ जुलै :** आजच्या धावपळीच्या युगात माणुसकीचे आणि प्रामाणिकपणाचे दर्शन घडवणारी एक अत्यंत कौतुकास्पद घटना छत्रपती संभाजीनगर येथे घडली आहे. शहरातील रहिवासी ऋषिकेश प्रदीपराव सातभाई आणि स्नेहा ऋषिकेश सातभाई यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणामुळे समाजासमोर एक उच्च दर्जाचा आदर्श निर्माण झाला आहे.सविस्तर माहिती अशी की दि २३ जून २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास, जेव्हा सुहास भाले यांचे सुमारे ३.५ तोळ्यांचे सोन्याचे ब्रेसलेट जबिंदा पेट्रोल पंप, छत्रपती संभाजीनगर परिसरात हरवले होते, तेव्हा ते ब्रेसलेट ऋषिकेश सातभाई यांना मिळून आले. अशा मौल्यवान वस्तूचा कोणताही



मोह न बाळगता, त्यांनी अत्यंत जबाबदारीने आणि योग्य खात्री करून ते ब्रेसलेट मूळ मालक सुहास भाले यांना सुरक्षितरित्या परत केले.याप्रसंगी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, समाजात अशा प्रामाणिक कृत्यांमुळे विश्वास आणि सुरक्षिततेचे वातावरण दृढ होते. समाजातील प्रत्येक नागरिकाने अशा प्रकारे जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे वागून सामाजिक मूल्यांची जोपासना करावी. आपली ही वर्तणूक इतर नागरिकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

"पोलीस आयुक्तांकडून गौरव-" : या चांगल्या कार्याची दखल घेत छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार (भा.पो.से.) यांनी ऋषिकेश सातभाई आणि स्नेहा सातभाई यांना आयुक्तालयात सन्मानाने निमंत्रित केले. त्यावेळी त्यांचे कुटुंबीय व सोसायटीमधील नागरिक देखील हजर होते. ऋषिकेश सातभाई यांच्या या प्रामाणिकपणाचे आणि सामाजिक मूल्यांचे कौतुक करत पोलीस आयुक्तांच्या हस्ते त्यांना विशेष 'प्रशंसापत्र' देऊन गौरवण्यात आले. पोलीस आयुक्तांनी त्यांच्या कार्याचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

# मतदानाच्या अधिकाराला अधिकप्रभावी करण्याचा प्रयत्न.म्हणजे एसआयआर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:**मतदानाचा दिवस उजळतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तू वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही. तू त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदी पासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी. यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण. (एस आय आर) ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही ती प्रत्येक पात्र नागरिकांच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया

घराचा मजबूत पाया दिसत नाही पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते मतदार यादीची अचूकता

मतदार यादी ही केवळ नावाची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकांच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाही वरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

"एसआयआर का आवश्यक आहे.?"

दरवर्षी नियमित पुनरिक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशावेळी एस आय आर राबविण्यात येते.

या विशेष पुनरिक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक अध्यायवत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर पत्त्यातील बदल नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहिती मध्ये बदल होऊ शकतात. एस आय आर या सर्व बाबीकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम. पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकांचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते

घर भेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा

या प्रक्रिये दरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ. हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित रहावा. यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. याच्या नोंदीमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणीचा सामना करावा लागू नये यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे प्रत्येक मतदारासाठी आहे.

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागांसाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. इतका सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. की प्रत्येक वेळी बळकट होते. जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे ठेवून केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चितपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापूर्वी मर्यादित राहत नाही ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक रड करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते. कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाही वरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही कोणासाठी तरी नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय आणि म्हणूनच ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्याच सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.

महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार 30 जून ते 29 जुलै 2026 या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटीद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात. आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी. दावे व हरकतीची प्रक्रिया पूर्ण करून दि.7. ऑक्टोंबर 2026 रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित सुरक्षित रहावा हाआहे.

## बंद कचरा कुंडीत कचरा टाकणाऱ्या व्यापाऱ्यांवर मनपाची कारवाई; 6. हजार 700 रुपयाचा दंड वसूल

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानांतर्गत विष्णू जिनिंग परिसरातील बंद करण्यात आलेल्या कचराकुंडीत पुन्हा कचरा टाकणाऱ्या व्यापाऱ्यांवर मंगळवारी दि.7. जुलै मंगळवारी दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच सिंगल युज प्लास्टिक व कॅरीबॅग तसेच प्लास्टिक कंटेनर चा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यावरही कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाई संबंधित व्यापाऱ्याकडून एकूण.6. हजार 700 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. शहर स्वच्छ व प्लास्टिक मुक्त ठेवण्यासाठी महापालिकेकडून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही कारवाई महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या मार्गदर्शनात उपयुक्त प्रज्ञावंत कांबळे. तुकाराम कदम. सहाय्यक आयुक्त. मुख्य स्वच्छता निरीक्षक. श्रीकांत कुरा तसेच स्वच्छता निरीक्षक शशी लहाने यांच्या नेतृत्वात करण्यात आली. परभणी शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये तसेच सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळून महानगरपालिकेच्या स्वच्छता उपक्रमात सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विशेष पुनरिक्षण प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या बुथ प्रतिनिधींनी सहयोग द्यावा- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, दि.८(जिमाका)- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे कामकाज सुरु आहे. या कामात मतदान केंद्रस्तरावर काम करणाऱ्या बुथ प्रतिनिधींनी सहयोग द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. मनपाचे अपर आयुक्त रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड आदी उपस्थित होते. तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा यांनी आवाहन केले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या आता घरोघरी भेटी सुरु आहेत. तेथे मतदारांना पडताळणी अर्ज भरुन घेतला जात आहे. त्यासाठी राजकीय पक्षाने नियुक्त केलेल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी आपल्या स्थानिक संपर्काचा वापर करुन फॉर्म मतदारांकडून भरुन घ्यावे व जमा करावे.

### अतिक्रमण, रस्त्यावरच रिक्षांचा तळ, बेशिस्त पार्किंगमुळे स्मार्ट बसही अडकते

## महात्मा फुले चौकात वाहतुकीचा बोजवारा; मनपा आणि वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष कधी थांबणार?

### शाळकरी विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या मध्यवर्ती आणि सर्वाधिक वर्दळीच्या औरंगपुरा येथील महात्मा फुले चौकात वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. अतिक्रमण, रस्त्यावरच उभ्या राहणाऱ्या रिक्षा, बेशिस्त दुचाकी पार्किंग आणि फेरीवाल्यांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे हा चौक दिवसातून अनेक वेळा वाहतूक कोंडीत अडकत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की महापालिकेच्या स्मार्ट बसलाही चौकातून वळणे कठीण होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



महात्मा फुले चौक हा शहरातील प्रमुख व्यापारी, शैक्षणिक आणि वाहतुकीचा केंद्रबिंदू आहे. दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि विविध भागांतून येणारी वाहने या चौकातून प्रवास करतात. मात्र रिक्षा स्टँड उपलब्ध असतानाही अनेक रिक्षाचालक रस्त्यावरच रिक्षा उभ्या करत असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी पडते. त्यातच नाश्त्याच्या हॉटेलांवर येणारे ग्राहक रस्त्यालगत दुचाक्या उभ्या करत असल्याने कोंडीत आणखी भर पडते.

चौकात अनेक व्यापारी आस्थापना, शाळा आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने असल्याने सकाळी,दुपारी आणि सायंकाळी वाहतुकीचा ताण प्रचंड वाढतो. शाळकरी विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. एखादी रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलाचे वाहन या कोंडीत अडकल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

महापालिकेकडून शहरभर अतिक्रमण हटाव मोहिमा राबवल्या जात असल्याचा दावा केला जातो. मात्र शहराच्या मध्यवर्ती महात्मा फुले चौकातच अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि रिक्षांची मनमानी कायम असल्याने या मोहिमा केवळ कागदावरच आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वाहतूक शाखेकडूनही येथे कायमस्वरूपी नियोजन किंवा प्रभावी कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून रस्त्यावरील अतिक्रमण तातडीने हटवावे, रिक्षा स्टँड शिस्तबद्ध करावा, बेशिस्त पार्किंगवर कठोर दंडात्मक कारवाई करावी आणि चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहराच्या मध्यभागी असलेला हा चौक दररोज वाहतूक कोंडीने ठप्प होत असताना प्रशासन मात्र मूकदर्शकाची भूमिका घेत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

## अजिंठा घाटात दरड कोसळली



**फर्दापूर :** छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात दरड कोसळली आणि मोठमोठे दगड रस्त्यावर पडले बुधवारी सकाळी पासून फर्दापूर परिसरात पाऊस सुरू असल्याने छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात दरड कोसळली असून मोठमोठे दगड रस्त्यावर पडले असुन यामुळे वाहतूक साठी मोठी अडचण येत होती यामुळे घाटात काही वेळा ट्राफिक जाम होत होती दैनिक लोकमत ने हे वृत्त आपण छापले आहे की अजिंठा घाटात दरड व दगड कोसळण्याच्या मार्गावर आहे आपण संकेत दिले होते तरी बुधवारी सकाळी घाटात दरड कोसळली आणि दगड रस्त्यावर येऊन पडलेल्या स्थितीत आहे तरी या विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकर दरडी,दगड तसेच नाल्या बंद पडल्याने यांची सोय करण्यात यावी जेणेकरून वाहतूक सुरळीत चालू राहील

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वैजापूर, गंगापूर येथील शिबिर कार्यालये कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर, दि.८(जिमाका)- वैजापूर येथील नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची स्थापना झाली असून त्या अंतर्गत वैजापूर व गंगापूर या दोन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या दोन्ही तालुक्यातील नागरिकांना अधिक सुलभ सेवा मिळावी यासाठी शिबिर कार्यालये कार्यान्वित करण्यात आली असल्याचे उपप्रादेशीक परिवहन अधिकारी वैजापूर संदीप निमसे यांनी कळविले आहे.

शिबीर कार्यालयाचे कामकाजाचे दिवस याप्रमाणे- गंगापूर १- महिन्यातील पहिला मंगळवार, लासूर- दुसरा मंगळवार, गंगापूर-२- तिसरा मंगळवार, शिवूर बंगला-चौथा मंगळवार, वाळूज- प्रत्येक शुक्रवार. वेळापत्रकाप्रमाणे शिबिराच्या दिवशी शासकीय सुटी असल्यास त्या दिवसाचे नियोजन कामकाजाच्या पुढच्या दिवशी करण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. तरी नागरिकांनी शिबिर कार्यालयात लायसन्स, वाहन हस्तांतरण, नवीन वाहन नोंदणी, वाहन तपासणी, परवाने व इतर सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## जुने वाहन व बेवारस वाहनावर होणार कारवाई; महानगरपालिका व वाहतूक शाखेची संयुक्त बैठक

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** शहरातील विविध मुख्य रस्त्यावर वर्षानुवर्ष उभी असलेली बेवारस व जुनाट वाहने पाठविण्यासाठी महानगरपालिका आणि पोलिसांच्या शहर वाहतूक शाखेने संयुक्त कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात सोमवारी दि.6. महापालिका व शहर वाहतूक शाखेची संयुक्त बैठक पार पडली.

महापालिका कार्यालयात महापौर सय्यद पाल यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार उपस्थित होते. या बैठकीत शहरातील अनेक रस्त्यावर दीर्घकाळापासून उभी असलेली जुनी वाहने वाहतुकीस मोठा अडथळा ठरत असून यापूर्वी अशा वाहनामुळे अपघात व इतर अनुचित घटनाही घडल्या आहेत. यापुढे अशा वाहनामुळे घटना दुर्घटना घडली तर त्या संबंधित वाहन चालक जबाबदार राहतील तसेच ही बाब लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना अशा वाहनावर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. महापौर सय्यद इकबाल यांनी अशा वाहनांच्या मालकांना तात्काळ आपली वाहने सार्वजनिक रस्त्यावरून हटवण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा महानगरपालिकेमार्फत संबंधित वाहने जप्त करून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी शहरातील महत्त्वाच्या चौकामध्ये व गर्दीच्या ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी शहर वाहतूक शाखेला महानगरपालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

## राममंदिर देणगी कथित गैरव्यवहाराविरोधात शिवसेनेच्या 'रामरक्षा' आंदोलनास प्रारंभ

### चंद्रकांत खैरे यांचे जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांना निवेदन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील देणग्यांमध्ये कथित घोटाळा व गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जाहीर केलेल्या 'रामरक्षा' आंदोलनाला छत्रपती संभाजीनगरमधून सुरुवात करण्यात आली. या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



राममंदिर उभारणीसाठी देश-विदेशातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने रोख रक्कम, सोने-चांदीचे दागिने तसेच विविध वस्तूंच्या स्वरूपात देणग्या अर्पण केल्या. या देणग्यांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांमुळे रामभक्तांच्या भावना दुखावल्या असून, या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च पातळीवर निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी चंद्रकांत खैरे यांनी सांगितले की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार राज्यभर 'रामरक्षा' आंदोलन राबविण्यात येत आहे. या आंदोलनांतर्गत साधू-संतांना निवेदने देण्यात येणार असून, राममंदिर व हनुमान मंदिरांसमोर रामरक्षा पठण, हनुमान चालीसा आणि महाआरती करून जनजागृती केली जाणार आहे.

या प्रसंगी माजी महापौर सुदाम सोनवणे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, महिला आघाडीच्या सुनीता देव, अनिता मंत्री, आशा दातार, सुकन्या भोसले, मीरा देशपांडे, कांता फसाटे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राममंदिरातील देणगी गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या आंदोलनामुळे राज्याच्या राजकीय व धार्मिक वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली असून, आगामी काळात हे

## कापडशिंगी प्राथमिक आरोग्य केंद्र वाऱ्यावर; वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहण्याची एलर्जी

हिंदू प्रकाशवार्ता /गोपाल सातपुते

हिंगोली | सेनगाव तालुक्यातील कापडशिंगी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळण्यात अडचणी येत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. रात्री-अपरात्री आजारी पडणारे रुग्ण, गरोदर महिला तसेच सर्पदंशासारख्या आपत्कालीन घटनांमध्ये आरोग्य केंद्राचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना चोवीस तास आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. स्थानिक पातळीवरील आजारांवर नियंत्रण, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, गरोदर महिला व नवजात बालकांची आरोग्य सेवा, लसीकरण, कुटुंब नियोजन, क्षयरोग, कुष्ठरोग, हिवताप, हत्तीरोग, अंधत्व निर्मूलन आदी विविध जबाबदाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत पार पाडल्या जातात.




मात्र कापडशिंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने या सेवांवर परिणाम होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेषतः पावसाळ्यात जलजन्य आजार, सर्पदंशाच्या घटना आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने उपचार मिळणे कठीण होत आहे. ग्रामीण भागातील अपुरी दळणवळण व्यवस्था लक्षात घेता रात्रीच्या वेळी गरोदर महिला व गंभीर रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे.

कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्राच्या इमारती आणि यंत्रणा असूनही अधिकारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

कापडशिंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नियमानुसार मुख्यालयी राहून २४ तास आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## जालन्यात संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराज पालखीचे स्वागत

### भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची सपत्नीक आरती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना :** आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र सावखेडा (ता. भोकरदन, जि. जालना) येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे बुधवारी जालना शहरात उत्स्फूर्त आणि भक्तिभावपूर्ण स्वागत करण्यात आले. पालखीच्या आगमनाने शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सपत्नीक संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पालखीची विधिवत आरती करून दर्शन घेतले. पालखी सोहळ्याला उपस्थित वारकरी, भाविक आणि नागरिकांनी हरिनामाच्या गजरात संतांच्या पालखीचे स्वागत केले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात पालखीचे शहरातून स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने वारकरी, भाविक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.

## ग्रामीण आवास योजनेला वेग; लाभार्थ्यांना जागा व पाच ब्रास मोफत वाळू देण्याचे आदेश

### घरकुल मंजुरीसाठी विशेष मोहीम; महसूल व ग्रामविकास विभागाला जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील ग्रामीण आवास योजनेतील एकही पात्र लाभार्थी घरकुलापासून वंचित राहू नये, यासाठी घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमित जमिनीवरील घरे नियमानुसार करणे तसेच प्रत्येक लाभार्थ्याला बांधकामासाठी पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी महसूल व ग्रामविकास विभागाला दिले.





जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महसूल व जिल्हा परिषद प्रशासनाच्या संयुक्त आढावा बैठकीत त्यांनी आवास योजनांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (ग्रामीण विकास यंत्रणा) वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांच्या जागेचे प्रस्ताव, आराखडे व आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करून घरकुल मंजुरीची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश दिले. शासकीय, गायरान तसेच वन विभागाच्या अखत्यारितील जमिनीवरील प्रकरणे प्राधान्याने निकाली काढून आवश्यक परवानग्या त्वरित मिळवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना जवळच्या शासकीय वाळू डेपोतून पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी महसूल व ग्रामविकास विभागाने समन्वयाने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

शहरी भागातील प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रलंबित प्रस्तावांतील त्रुटी तातडीने दूर करून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी ग्रामीण भागातील जास्तीत जास्त गरजू कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम. यांनी ‘नशामुक्त अभियान’, ‘बालविवाहमुक्त संभाजीनगर’ आणि ‘कुपोषणमुक्त बालक’ या उपक्रमांमध्ये सर्व विभागांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

बैठकीत गंगापूर व वैजापूर तालुक्यातील घरकुलांसाठी मंजूर गायरान जमिनी ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित करण्यासंबंधीचे आदेशही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911